नियमित दिवाणी दावा क्र. ६१/२०१९
नि. क्र. ३५ लगत

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ वादी बँकेचा प्रतिनिधी मुकुंद श्रीपाद खांडेर यांचा पुढील सरतपास शपथेवर, वादीतर्फे विधीज्ञ श्री. के. एस. सहस्त्रबुध्दे यांच्याकडून –**

१५. मी आज पॉवर ऑफ ॲटर्नीचा मूळ दस्त सोबत आणला आहे. मी पूर्वी या दाव्यात सदर दस्ताची छायांकित प्रत जोडलेली आहे. सदरची पॉवर ऑफ ॲटर्नी ही बँक ऑफ इंडियाने मला दिनांक १४/१०/२०१६ रोजी दिलेली आहे. सदरचा दस्त आमचे जनरल मॅनेजर मृत्यूजंय कुमार गुप्ता व रामकृष्ण सिन्हा यांच्यासमक्ष पूर्ण करण्यात आले. ते दोघेही बँक ऑफ इंडियाचे महाप्रबंधक होते. सदरचा दस्त विक्रम सिन्हा यांनी अटेस्टेड केलेला आहे. मी त्या दस्तावर त्यांच्यासमोरच सही केली व त्यांनीही त्या दस्तावर त्यांच्या स्वाक्षरी माझ्यासमक्षच केल्या, त्यामुळे, मी त्यांच्या सहया ओळखतो. तो दस्त माझ्या हक्कात करून दिल्यानंतर मी बँकेच्या वतीने मला ज्या बाबत अधिकार दिलेले आहेत ती सर्व कामे करत आहे. त्या दस्तानुसार या दाव्याबाबत सुध्दा बँकेने मला प्राधीकृत केलेले आहे. सदर मुखत्यारपत्रातील मजकूर खरा आहे. मला आता दाखविण्यात आलेली दस्तऐवजांची यादी निशाणी ०५ मधील अनुक्रमांक १४ कडील मुखत्यारपत्राची प्रत ही मूळ मुखत्यारपत्राची छायांकित प्रत आहे. मी सोबत आणलेला मूळ दस्त व मला दाखविण्यात आलेली छायांकित प्रत यांतील मजकूर एकसारखाच आहे, एकच आहे (साक्षीदाराने केलेला जबाब तसेच या न्यायालयाने निशाणी ३६ लगत केलेला आदेश यांचा विचार करता, सदर प्रतीस **निशाणी ४९** देण्यात आली).

**सरतपास पूर्ण**.

**प्रतिवादींच्या विधीज्ञा यांच्या विनंतीवरुन प्रकरण उलटतपासाकरीता तहकूब**.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA
Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.08.23 17:02:26 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक २३.०८.२०२४

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख

- : C E R T I F I C A T E : -

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 23/08/2024 |
| Evidence signed by PO. on | :- | 23/08/2024 |
| Evidence uploaded on | :- | 23/08/2024 |